# हज्जार डोळेवाली

वासावरुन त्याला कळलं, सकाळ झाली!

त्याने सगळे डोळे उघडून सगळीकडे पाहिलं. आणि त्याला धक्काच बसला!!

आपल्यासारखं या घरात कुणी असेल असं त्याला वाटलं नव्हतं. दोन तीन दिवसापूर्वीच तो या घरात आला होता.

इतके दिवस आपल्या मित्रांसोबत नाक्यावर उभं राहून टपोरीगिरी करताना मजा वाटायची. गप्पा मारायला पण त्याचे निरनिराळ्या रंगाचे मित्र असायचे. आणखीन ही कुणी कुणी असायचे.

पण या घरात आल्यापासून त्याची जिंदगीच सारी बदलून गेली.

कुणी मित्र नाही की कुणाशी गप्पा नाहीत.

तो विचित्र वास आला की त्याला कळायचं आता आपण भाजून निघणार.

मग.. तो डोळे घट्ट करुन सहन करायचा वाफाळता गरम काळा लगदा आणि त्यातून टपकणारं उकळतं लालभडक पाणी.

त्याने आपले शंभर डोळे उघडून नीट पाहिलं.....तिला हज्जार डोळे होते.

शंभर पैकी त्याचे मधले काही डोळे काळवंडले होते. काही डोळे अर्धवट बंद झाले होते. तिला आपल्यापेक्षा जास्त डोळे आणि तेही सारे स्वच्छं हे पाहून त्याला बरं वाटलं.

सत्तावीस डोळ्यांनी तिच्याकडे पाहात तो म्हणाला, “हाSSय!”

ती हसून म्हणाली, “काय रे चिंट्या? इथे नवीनच आलास वाटतं? आता जरा तयारीत राहा, चहा तयार होतोय.”

चहाला उकळी फुटताच काकूनी गॅस बंद केला.

चहा गाळायला गाळणं घेतलं.

आणि गाळण्याने दचकून डोळे घट्ट केले.

गाळणं चहात भिजलं आणि चहाचा वास घरभर पसरला. चहाच्या वासानेच काकांची झोप उडाली.

काका बाहेरुनच ओरडले, “कळलं होSS. आहे तैय्यार चहासाठी!”

काकूंनी चहाचा चोथा फेकला आणि पातेलं व गाळणं सिंक मधे ठेवलं. त्यात थोडं पाणी ओतलं.

गाळण्याच्या जीवात जीव आला.

त्याचे तापलेले डोळे निवाले.

तिच्याकडे पाहात गाळणं पुन्हा म्हणालं," अगं, चहा पिताना जरा स्वतःच्या अंगावर सांडला तर लगेच आऽऽय ऊऽऽई करत ओरडतील पण माझ्या डोळ्यांवर मात्र उकळता चहा ओततील!

मला एक समजत नाही, जरा चहा निवल्यावर गाळला तर काय होईल ?

माझ्यावर उकळता चहा ओतायला या काकूंना काय मजा येते, तेच मला समजत नाही.

माझ्या मधल्या पंचेचाळीस डोळ्यात उकळता चहा गेल्यावर काय होतं.. ?.. हे या माणसांना दोन डोळे असून पण दिसत नाही ?"

"व्वा ! काय पण बोललास! अरे दिसत नाही म्हणून तर हे डोळ्याला चष्मा लावतात. पण 'चष्मा लावून काही अक्कल येत नाही' ही चिनी म्हण तू ऐकलीच असशील.

अरे यांना दिसतं पण वळत नाही ! काय करणार ?" असं चाळणीने म्हणताच गाळणं वैतागलं.

"काय करणार म्हणजे ?"

"अरे चिडू नकोस. त्या काकांना अगदी गरमागरम चहा लागतो. मग त्या बिचाऱ्या वग्नकू तरी काय करणार ? गाळतात उकळता चहा."

"तुला ही होतो का असा त्रास ?"

"छे ! माझा त्रास वेगळाच आहे ! तुझा गरम त्रास तर माझा थंड त्रास."

"म्हणजे ? तुझ्यातून थंड चहा गाळतात ?"

"नव्हे रे ! माझ्यातून सगळ्या घाणेरड्या गोष्टी गाळतात.

म्हणजे कुठल्याही गोष्टीतली घाण काढून टाकण्यासाठी माझा उपयोग करतात. तांदूळ, डाळी, कडधान्यं, चिरलेली भाजी जर त्यांना धुवायची असेल तर त्यात ते पाणी ओततात. आणि मग त्या पातेल्यावर मला पालथं घालून माझ्या डोळ्यातून ते घाणेरडं पाणी ते बाहेर सोडतात.

काहीवेळा रात्रभर भिजत घालून आंबलेली कडधान्यं सकाळी माझ्यात घालतात.

मग या कडधान्यांना मोड येतात आणि ते डायरेक्ट माझ्या डोळ्यात टचाटच शिरतात. 'हज्जार डोळे असून आंधळे' असं आमच्यात म्हणतात ते काय उगीच नाही."

"चाळणीबाई, तुम्हाला मी काही सांगायचं म्हणजे उगाच 'चाळणीतून चहा गाळल्यासारखं होईल' म्हणून तुम्ही रागावणार नसाल तर सांगतो."

हे ऐकताच चाळणी डोलली आणि गाळणं पुढे बोलू लागलं," उगाच निगेटिव्ह विचर करू नका. अहो त्या कडघान्यांना मोड आल्यामुळे तुमचे डोळे स्वच्छं तरी होतात ना ? माझ्या नशिबी हे सुख ही नाही !"

"अरे प्रिय मित्रा तुझ्या या बोलण्याने मला नवीनच दृष्टी मिळाली!

पण मित्रा.. ..

तुला जे सुख आहे ते घरात इतर कुणालाच नाही, हे तुला माहित आहे का ? अरे तुझ्यातून कधी एकदा चहा गाळला जातो, याची घरातले सर्वजण आतुरतेने वाट पाहात असतात. जराजरी उशीर झाला तरी तिकडे काकांची बेचैनी वाढते.

आपली कुणीतरी वाट पाहात असणं, हे किती सुखावह आहे किनई ?" असं म्हणत चाळणी डोळे विस्फारुन गाळण्याकडे पाहू लागली.

"या घरातल्यांच्या आनंदासाठी आपण कुठल्याही गोष्टीला उघड्या डोळ्याने समोरे जातो यात अधिक सुख आहे किनई ?" गाळण्याचं हे बोलणं ऐकून चाळणी हज्जार डोळ्यांनी हसली.

"हज्जार डोळे ज्यांच्या घरी, त्यांचीच तब्येत ठणठणीत खरी !" .. .. असं कोण म्हणालं असेल सांगा बरं.

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

**राजीव तांबे.**